# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक २०८ वा शुक्रवार दि.१९ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com


## मनपा शाळांबाबत चुकीची माहिती पालिकेकडून वरिष्ठांना अहवाल सादर

लातूर/प्रतिनिधी: काही वृत्तपत्रांमध्ये मनपा शाळां बाबत चुकीची माहिती प्रकाशित करण्यात आली असून वास्तव वेगळेच आहे. संबंधित शाळांची दुरुस्ती मनपाने पूर्वीच केलेली असून आणखी इतर शाळांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आलेला आहे.शिवाय शाळांच्या व्यवस्थेबाबत चुकीची माहिती वृत्तपत्रांना दिल्याबद्दल पालिकेकडून संबंधित मुख्याध्यापकावर शिस्तभंगाच्या कार्यवाहीचा प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे.

मनपाच्या आर्वी शिवारातील शाळा क्रमांक १०,लेबर कॉलनीतील शाळा क्रमांक २६ व उर्दू शाळा क्रमांक १३ च्या इमारतींची दुरावस्था झाल्याचे वृत्त काही दैनिकांनी प्रकाशित केले होते.मुळात या इमारतींची दुरुस्ती तसेच शाळा डिजिटलायझेशन व शौचालय बांधकाम यासाठी १ कोटी ९९ लाख ९९ हजार ९४२ रुपये व ९१ लाख ३० हजार ९४७ रुपयांचे दोन स्वतंत्र प्रस्ताव दिनांक १५ मार्च २०२३ रोजी प्रधान सचिव, नगर विकास विभाग मंत्रालय यांना पाठविण्यात आलेले आहेत.प्रधान सचिवांकडून मंजुरी मिळाल्यानंतर या शाळांच्या इमारतींचे नूतनीकरण करण्यात येणार आहे.

आणखी एका प्रकरणात एका दैनिकाने ८ बाय ८ जागेत ५३ मुले कशी बसवावी ? अशा मथळ्याचे वृत्त प्रकाशित केले होते.वृत्त प्रकाशित झाल्यानंतर मनपाचे शिक्षणाधिकारी व क्षेत्रीय अभियंता यांनी तेथे जाऊन पाहणी केली. २००६ यावर्षी सिग्नल कॅम्प मधील झोपडपट्टी आर्वी गायरान येथे स्थलांतरित झाली. तेथील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून मनपाने शाळा सुरू केली. शाळेतील वर्ग खोल्यांचा आकार ८ फूट बाय ८ फूट असा नाही तर एक खोली १८ फूट बाय ८ फूट तर दुसरी १८ फूट बाय ११ फूट आहे .यापैकी एक खोली खराब झालेली होती.दिनांक १९ जुलै २०२३ रोजी या खोलीची दुरुस्ती करून घेण्यात आली.सध्या ही खोली विद्यार्थी वापरत आहेत.या शाळेस मनपाने १० लक्ष रुपयांचे डिजिटल साहित्य पुरवले आहे. संगणक,प्रिंटर,टेबल, खुर्च्या,साऊंड बॉक्स आदीचा त्यात समावेश आहे. हे साहित्य मुख्याध्यापकांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळत असून बसण्याचीही सोय झालेली आहे,असा अहवाल संबंधित मुख्याध्यापकांनी दिला आहे.

असे असतानाही खोटी माहिती पुरविल्याबद्दल संबंधित मुख्याध्यापकावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव दाखल करण्यात आलेला असल्याची माहितीही मनपाच्या वतीने देण्यात आली.

## दर्जी बोरगाव येथील चिन्मयानंद स्वामी मंदिरास पर्यटनाचा ब दर्जा मिळवून देऊ - आ. कराड

लातूर दि.१८- असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या रेणापूर तालुक्यातील मौजे दर्जी बोरगाव येथील श्री सद्गुरु चिन्मयानंद स्वामी महाराज मंदिराच्या (मठ) सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाच्या पर्यटन विभागा कडून 'ब' दर्जा मिळवून कोट्यावधीचा निधी उपलब्ध करू देऊ अशी ग्वाही भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

श्री सद्गुरु चिन्मयानंद स्वामी महाराज समाधी शताब्दी सोहळ्यानिमित्ताने येत्या ३ ते १० फेब्रुवारी २०२४ या दरम्यान हभप रामायणाचार्य शंकर महाराज शेवाळे पुणे यांची रामकथा आयोजित करण्यात असून या रामकथा, ज्ञानयज्ञ आणि अखंड हरिनाम सोहळ्याचे निमंत्रण भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांना लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात दिले. त्याचबरोबर मंदिर परिसराच्या विकासासाठी १० लक्ष आणि मंदिर लगत असलेल्या नदीवर



घाट बांधकामा करिता ३० लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. कराड यांचे मंदिर ट्रस्ट आणि दर्जी बोरगाव येथील ग्रामस्थांनी यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले.


यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांच्याशी दर्जी बोरगाव येथील शिष्टमंडळाने सविस्तर चर्चा करून चिन्मयानंद स्वामी महाराजांच्या समाधी सोहळ्याचे शंभरावे वर्ष असल्याने भव्य दिव्य नियोजन करण्यात येत आले असून मंदिरात नित्य नियमाने हजारो भाविक भक्त दूर दूर हून मोठ्या संख्येने येत असतात अशी माहिती दिली.

भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता आणि मंदिर परिसराचा विकास व्हावा याकरिता त्याचबरोबर भाविकांना सोई सुविधा मिळाव्यात यासाठी राज्याचे पर्यटन मंत्री यांच्याशी चर्चा करून दर्जी बोरगावच्या या सद्गुरु चिन्मयानंद स्वामी महाराज मंदिरास राज्याच्या पर्यटन विभागाचा 'ब' दर्जा मिळवून देऊ आणि विविध विकास कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी उपलब्ध करून घेऊ अशी ग्वाही यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी शिष्टमंडळाशी बोलताना दिली आणि समाधी शताब्दी सोहळ्यात निश्चितपणे येण्याचे मान्य केले.

यावेळी सद्गुरु चिन्मयानंद स्वामी मंदिर ट्रस्टचे सचिव ॲड. संतराम चेवले, भाजपाचे तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, दर्जीबोरगावचे सरपंच रमेश कटके, उपसरपंच गोविंद माने, भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रकाश रेड्डी, श्रीकृष्ण पवार, लक्ष्मण काळे, अंकुश लोणकर, सुरेश कटके, निजाम शेख, गोविंद माने यांच्यासह अनेकजण होते.

## श्री राम जन्मभूमी मंदिरावर आधारित टपाल तिकिटांचे प्रकाशन

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदींनी श्री राम जन्मभूमी मंदिरावर आधारित टपाल तिकीटे प्रसिद्ध केली आहेत. यासोबतच जगभरात श्रीरामावर आधारित टपाल तिकिटांचे कलेक्शन असणा-या एका पुस्तकाचे देखील प्रकाशन करण्यात आले.आज श्री राम जन्मभूमी मंदिरावर आधारित सहा टपाल तिकिटे प्रसिद्ध करण्यात आली. तसंच, जगभरात श्रीरामावर आधारित असणा-या सर्व टपाल तिकिटांचा एक अल्बम प्रसिद्ध करण्यात आला आहे. या निमित्ताने मी देशातील सर्व नागरिकांचं आणि जगभरातील राम भक्तांचं अभिनंदन करतो, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान मोदींनी यावेळी दिली.या टपाल तिकिटावर श्रीराम मंदिर, 'मंगल भवन अमंगल हारी' ही ओळ, सूर्य, शरयू नदी आणि मंदिराच्या आजूबाजूच्या मूर्ती दाखवण्यात आल्या आहेत. इतर तिकिटांमध्ये श्रीराम मंदिर, भगवान गणेश, श्री हनुमान, जटायू, केवटराज आणि माता शबरी यांचा समावेश आहे. या तिकीटाच्या डिझाईनमधून आकाश, हवा, अग्नी, पृथ्वी आणि जल असे पंचमहाभूत दिसत आहेत.



## वैदू समाज सभागृहा करिता जागा उपलब्ध करून देण्याची समितीची मागणी



लातूर :--- लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या शिष्टमंडळाच्या वतीने आज महाराणा प्रताप नगर ग्रामपंचायत सरपंच सौ.संगीताताई पतंगे ,उपसरपंच राजकुमर पवार, ग्रामपंचायत ग्रामसेवक बापू गोमसाळे यांच्या नावे वैदू समाज सार्वजनिक सभागृहा करिता महाराणा प्रताप नगर ग्रामपंचायत हद्दीत महादेव नगर , प्रबुद्ध नगर भागात मोठ्या संख्येने वैदू समाज बांधव वास्तव्यास असून या परिसरात सार्वजनिक सभागृह उपलब्ध नसल्याने लग्न कार्या सह विविध सामाजिक उपक्रमांकरिता समस्या निर्माण होत आहे याची तात्काळ दखल घेऊन महाराणा प्रताप नगर ग्राम पंचायत हद्दीत वैदू समाज सर्वजनिक सभागृहा करिता जागा उपलब्ध करून देण्याच्या मागणीचे निवेदन देण्यात आले आज महाराणा प्रताप नगर ग्रामपंचायत सरपंच संगीता पतंगे यांची शिष्टमंडळाने प्रत्यक्ष भेट घेऊन सकारात्मक चर्चा करीत निवेदन देण्यात आले यावेळी लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समीतीचे अध्यक्ष दीपक गंगणे, सचिव बाबासाहेब बनसोडे , भगवेश्वर धनगर, शंकर जाधव,नवनाथ चव्हाण,सुनील चव्हाण,विशाल चव्हाण,सुनील धनगर,विकास चव्हाण,मनोज चव्हाण,बाबा धनगर,विष्णू चव्हाण,विलास चव्हाण यांच्या सह वैदु समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

## आमदार धिरज देशमुख यांनी घेतली उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट

### भरीव निधी आणण्याचे काम सुरूच

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना असंख्य विकासकामे मंजूर करून 'लातूर ग्रामीण'साठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणला. आता विरोधी पक्षात राहून विविध विकासकामे, भरीव निधी आणण्याचे काम सुरू आहे. गावात विविध योजना, विकासकामे नेण्याबरोबरच प्रत्येक गावात आमदार निधीही पोहचवण्याचाही माझा प्रामाणिक प्रयत्न आहे. त्यामुळेच 'लातूर ग्रामीणमध्ये वेगवेगळी विकासकामे झाली आणि अनेक विकासकामे सुरू आहेत, याचा मला अभिमान आहे, अशी भावना आमदार श्री. धिरज देशमुख यांनी या वेळी व्यक्त केली.



लातूर : लातूर ग्रामीण मतदारसंघातील विकासकामांसंदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांची 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी गुरुवारी (ता. १८) मंत्रालयात भेट घेतली. आमदार श्री. धिरज देशमुख यांच्या सर्व मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी यावेळी दिल्या.लातूर ग्रामीण मतदारसंघातील पाणी, रस्ते, वर्ग खोल्या, ग्रामीण रुग्णालय याबाबतच्या अनेक मागण्या या बैठकीत उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री श्री. अजित पवार यांच्याकडे आमदार श्री. धिरज देशमुख यांनी केल्या. तसेच, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी संबंधित अनेक विषयही या बैठकीत मांडले. या सर्व मागण्यांना अजित पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी वैद्यकीय शिक्षणमंत्री व विशेष सहाय्य मंत्री श्री. हसन मुश्रीफ उपस्थित होते.

## चिकुर्डा शिवारात अवैद्य मुरूम उत्खनन जोरात लातूर तहसील प्रशासनाची जाणिव पुर्वक डोळेझाक

लातूर / प्रतिनिधी:-तालुक्यातील चिकुर्डा शिवारातील गट १४० व अखरवाई शिवारात इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैद्य मुरूम उत्खनन व खदान उत्खनन हे तहसील प्रशासनाच्या तलाठी मंडळ अधिकारी नायब तहसीलदार तहसीलदार यांच्या सहमतीने होत त्यावर तात्काळ कारवाई करावी उत्खननाचे पंचनामे करावेत व संबंधित माफिया व शेतकऱ्यांवर रॉयल्टी वसूल करण्यात यावी अशी मागणी शिव महासंग्राम संघटनेचे अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अझरभाई शेख यांनी केली आहे. लातूर तालुक्यातील चिकुर्डा शिवारात व इतर ठिकाणीही मुरूम व अवैद्य खदान उत्पन्न मोठ्या प्रमाणात सुरू असून या भागातील अनेक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय तहसील कार्यालय उपविभागीय अधिकारी कार्यालय यांना निवेदन देऊन सुद्धा याच्यावर काही कारवाई झाली नसुन प्रशासनाच्या सहमतीने हे उत्खनन





माफिया मुरुम उत्खनन व अवैद्य खदान उत्खनन मोठ्या प्रमाणात करत आहेत याचा शिवारातील व शेजारील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे यांना शेजारील शेतकऱ्यांचे काही देणे घेणे नसून आपल्या फायद्यासाठी अवैद्य रीतीने मुरुम व उत्खनन करून दगड मोठ्या प्रमाणात विकत आहेत व माफिया आपल्या स्वार्थासाठी प्रशासनाला हाताशी धरून सरासपणे अवैध धंदे सुरू ठेवले आहेत याविषयी गेल्या अनेक दिवसापासून जिल्हा प्रशासन तहसील प्रशासन यांना निवेदन देऊन सुद्धा याकडे कसलीही कारवाई करीत नाहीत उलट डोळे झाक केली जाते याचा त्रास गावकरी व परिसरातील नागरिकांना होत आहे म्हणून चिकुर्डा शिवारातील अवैद्य मुरुम उत्खनन व खदान माफियांवर तात्काळ कारवाई करावी व अवैद्य मुरूम उत्खनन व खदान उत्खनन तात्काळ थांबवण्यात यावे केलेले उत्खनाची पंचनामे त्वरित करण्यात यावे व त्याची रॉयल्टी संबंधित शेतकऱ्याने करून वसूल करण्यात यावी किंवा त्याच्या खात्यावर बोजा टाकण्यात यावा जेणेकरून असे प्रकार थांबवले जातील व गावातील नागरिकांना त्रास होणार नाही जर मुरुम उत्खनन खदान माफिया चे उत्खनन प्रशासनाने तातडीने कारवाई जर नाही केली तर तहसील कार्यालय लातूर समोर आमरण उपोषण करणार असल्याचे शिव महासंग्राम संघटनेचे अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अझरभाई शेख यांनी सांगितले आहे.

## डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर यांना लहुजी कांबळे यांनी स्व:ताच्या मालकीचा बंगला दान

नवी मुंबई / के.एच. हनवते :- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या दि बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा या मातृसंस्थेवर विश्वास ठेवून स्वकष्टातून उभा केलेला बंगला डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर साहेबांच्या नेतृत्वाचा स्वीकार करून अधिकृत रित्या दान स्वरूपात दिला आहे...

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदर्श मानणारा समाज उदात्त उंतकरणाने समाजहितासाठी तथागतांची दान पारमिता अंगिकारून एक आदर्श समाजाची ओळख निर्माण करत आहे. हे आंबेडकरी चळवळीचे यश आहे. तथागतांचा धम्म सर्व जंम्बूदिपात पोहचला आणि टिकून राहिला तो दान देणाऱ्या दानशूर व्यक्तींच्या कर्तृत्वामुळे हा इतिहास आहे...दानशूर व्यक्तीमत्त्व आद. लहुजी कांबळे साहेब यांचा बंगला दान देण्याचा संकल्प गेल्या एक वर्षापासून झाला होता. त्यांनी स्वतः भिमराव यशवंतराव आंबेडकर साहेबांची भेट घेऊन माझा बंगला मी तुम्हाला स्वच्छेने दान करू इच्छितो अशी इच्छा व्यक्त केली होती...

महाराष्ट्रातील सांगली जिल्हा हा क्रांतिवीरांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. धनलक्ष्मी कुपवाड सांगली जिल्ह्यात वास्तव्यास असणारे लहुजी कांबळे यांच्या मालकीचा बंगला माळशिरस तालुक्यातील अकलूज या ठिकाणी असून हा बंगला दिनांक २ जानेवारी २०२४ रोजी डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर साहेबांच्या नांवे कायदेशीर रित्या हस्तांतरित करण्यात आला आहे...

लहुजी कांबळे साहेबांचे नाव भारतीय बौद्ध महासभेच्या इतिहासात स्वर्ण अक्षरांने लिहिले जाईल... डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर



साहेबांना दिलेला बंगला समाज उपयोगी कार्यास वापरण्यात यावा. त्या ठिकाणी अभ्यासिका, ग्रंथालय, गरीब घरातील मुलांना शिक्षणासाठी लाभ मिळावा यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात अशा सुचना डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर साहेबांनी पदाधिकाऱ्यांना केल्या आहेत...

सदर कार्यास हणमंत जगताप गुरुजी, लोंढे गुरुजी, बाळासाहेब गायकवाड गुरुजी, आण्णासाहेब वाघमारे गुरुजी यांनी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल त्यांच हि मनःपूर्वक आभार मानतो. डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर साहेबांनी निस्वार्थ पणे हि वास्तु समाज उपयोगी कार्यासाठी देऊन समाजाचा नेता म्हणून सर्वांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले आहे...

## संपादकीय....

# राजकारणाचा न्याय!

उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांमधील याचिकांची सुनावणी वेगवेगळी होणार की सर्वोच्च न्यायालय शिंदे गटाची याचिका मुंबईतून वर्ग करून एकत्रित सुनावणी करणार, हा प्रश्न आहे.पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला 'न भूतो न भविष्यति' बहुमत मिळाले. मनात भय उत्पन्न व्हावे, असे ते बहुमत होते. ते सुरक्षित ठेवण्यासाठी राजीव गांधी सत्तेत आल्यानंतर महिन्याभरात पक्षांतरबंदी कायदा झाला. १५ फेब्रुवारी १९८५ रोजी राष्ट्रपतींनी मान्यतेची मोहोर उमटविली. राज्यघटनेच्या दहाव्या सूचीत या कायद्याचा समावेश झाला. हा कायदा झाल्यापासून चार दशकांमध्ये पक्षांतरे थांबलेली नाहीत. सरकारे पडणे संपले नाही. सभागृहांमधील गटोपगटांची निर्मितीही गोठली नाही. थोडक्यात, या कायद्याचे राजकीय संस्कृती निवळशंख करण्याचे उद्दिष्ट बिलकुल साधलेले नाही. उलट, या कायद्यातील पळवाटा, चोरवाटा शोधण्याची अहमहमिका सुरू झाली. कज्जेदलालीने कळस गाठला. हे सारे लोकांचे राजकारण नसून कुरघोडीचे कायदेकारण असते. महाराष्ट्रात तेच चालू आहे.कुठेही 'जनतेचे न्यायालय' असे फलक लावून निकालांचा आपल्याला हवा तो अर्थ श्रोत्यांना सांगता येतो. मात्र, मतपेटी हेच जनतेचे एकमेव न्यायालय असते. विधानसभेच्या अध्यक्षांच्या निकालांना आव्हान देण्याची जागा न्यायालय ही असते. शिवसेनेने तसे ते सर्वोच्च न्यायालयात दिले आहे. दुसरीकडे, ठाकरे गटाच्या आमदारांना अध्यक्षांनी अपात्र का ठरविले नाही, अशी तक्रार करणारी याचिका शिंदे गटाने उच्च न्यायालयात केली आहे. असे असताना एका बाजूने व्यासपीठावर वकिलांना आणून विधानसभा अध्यक्षांच्या निकालाची चिरफाड करणे आणि दुसरीकडे, अध्यक्षांनी लगोलग आपल्या निकालाचे समर्थन करून, त्याची घटनात्मक वैधता अधोरेखित करणे, या दोन्ही बाबी न्यायासनासमोरील सुनावणी खेचून बाहेर जनतेत आणणे आहे. न्यायालयीन प्रक्रियेचे पावित्र्य आणि गांभीर्य उणावणारा हा घटनाक्रम आहे.शिवसेनेची रीतसर घटना होती का, तिच्यात सुधारणा कधी झाली, निवडणूक आयोगाला सादर केलेल्या पत्रामध्ये घटनादुरुस्तीचा उल्लेख होता का, पक्षात रीतसर पक्षांतर्गत निवडणूक झाली का, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या आधीन राहून अध्यक्षांनी काम केले का, शिवसेनेची २०१२ मधील घटनादुरुस्ती वैध की अवैध, यातील काही प्रश्नांची तीन व्यासपीठांवर छाननी झाली किंवा पुढेही होईल. पहिले व्यासपीठ विधानसभा अध्यक्षांचे. दुसरे निवडणूक आयोगाचे आणि तिसरे न्यायालयाचे. एकाच घटनेचा तीन ठिकाणी लागणारा अन्वय सारखा नसणारच. त्यामुळे, उद्धव ठाकरे यांच्या महा-पत्रकार परिषदेनंतर विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेले उत्तरही अनेक प्रश्न उपस्थित करणारे होते. पक्षांतरबंदी आणि त्यातून जन्माला येणारे विवाद सभागृहांच्या अध्यक्षांकडे निकालासाठी जावेत का, हा मूळ प्रश्न फार नाजूक आहे. हे सगळे अधिकार उद्या केवळ न्यायालयांकडे गेले तर संसदीय लोकशाहीतील अध्यक्षांच्या न्यायिक स्थानाला धक्का लागेल. तसे होणे उचित नाही. दुसरीकडे, कोणत्या सभागृहांचे अध्यक्ष हे पक्षपाती वागतात आणि कोणते अध्यक्ष निष्पक्ष निकाल देतात, हे ठरविण्याचा अधिकार कोणाचा? एखाद्या कज्जेदलालीत राजकीय पक्षच पक्षकार असेल तर त्याला असा ठपका ठेवण्याचा नैतिक अधिकार नाही. तो जास्तीत जास्त उपलब्ध कायदेशीर पर्याय वापरून वरच्या न्यायासनाकडे दाद मागू शकतो. शिवसेनेचे दोन्ही गट न्यायालयात गेले आहेत, हे त्या दृष्टीने योग्य झाले.लोकसभेची निवडणूक जवळ येते आहे. नंतर विधानसभेची निवडणूक येईल. दरम्यान उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांमधील याचिकांची सुनावणी वेगवेगळी होणार की सर्वोच्च न्यायालय शिंदे गटाची याचिका मुंबईतून वर्ग करून एकत्रित सुनावणी करणार, हा प्रश्न आहे. ती सुनावणी किती वेळेत संपून निकाल कधी लागणार आणि त्या निकालाची तामिली सध्याच्या सभागृहाची मुदत संपण्याच्या आत होणार की नाही, हे सारे प्रश्न अनुत्तरित आहेत. महाराष्ट्रातील प्रत्यक्ष सत्तेच्या राजकारणावर तीनही व्यासपीठांवर झालेल्या किंवा होणाऱ्या न्यायप्रक्रियेचा थेट परिणाम होतो आहे का, हा यातला कळीचा प्रश्न आहे. तसा तो होत नसेल तर या साऱ्या प्रक्रियेतील प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीने असणारी व्यर्थता नजरेआड करण्याजोगी नाही. आधी भाजपशी असणारी निवडणूकपूर्व युती तोडून उद्धव ठाकरे काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत गेले. मग एकनाथ शिंदे यांनी बंड करून ते सरकार पाडले. पुढे अजित पवार यांनीही जुना फसलेला राजकीय खेळ दुसऱ्यांदा यशस्वी करून दाखविला. हे सारे एकाच विधानसभेच्या कार्यकाळात घडले. असे शरद पवारांचे १९७८ चे 'खंजीरकांड' वगळता इतक्या घाऊक प्रमाणात कधी झाले नव्हते. या साऱ्या ट्रॅपिझच्या थरारक खेळाचा खरा न्यायमूर्ती शेवटी मतदार आहे. पक्षांतरबंदी कायदा आणि त्यातले असंख्य बदल यांचे जे मोठे अवडंबर उभे राहिले आहे, ते किती निरर्थक आहे, हे सगळे पक्ष रोजच्या रोज दाखवून देत आहेत. व्यवहारवादी राजकारणाला (रिअलपोलिटिक) नैतिक किंवा न्यायिक वेसण घालण्याला किती मर्यादा असतात, हे शिकविण्यासाठी महाराष्ट्राचे हे उदाहरण पुढे अनेक पिढ्या उपयोगी पडेल!

# विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील सर्वात मोठा घटक कुठे आहे?.

विश्वकर्मीय सुतार समाजाला राजकीय हिस्सेदारीसाठी बहुजन म्हणजे ओबीसींच्या समूहात आणि वैचारिक प्रवाहात आल्या शिवाय कोणताही पर्याय नाही,एकट्या 'विश्वकर्मीय' सुतार समाजाला राजकीय प्रवाहात सहभागी होता येणार नाही,याचा सुद्धा विचार करण्याची नितांत गरज आहे यासाठी सुतार समाजात खऱ्या अर्थाने वैचारिक समाज प्रबोधन करतांना जबाबदार असणारे स्वयंघोषित सुतार समाज नेते समाजात दिसत नाहीत.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ओबीसी समुहासाठी संविधानात तरतूद केलेली असतांना त्याकडे दुर्लक्ष करण्याचे कटकारस्थान अनेक कलम कसाई धर्माधिकारी यांनी केले,ओबीसी समाजाला अंधभक्त बनविण्यासाठी केलेल्या त्याग,समर्पण सेवेच्या सन्मानासाठी महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार एक पूर्वापार तडीपार असलेल्या चारित्र्य हीन माणसांच्या हस्ते देण्यात आला.त्यावेळी २५ लाख आध्यात्मिक ओबीसी भक्तांना ४२ अंश तापमान असणाऱ्या रखरखत्या उन्हात त्यांना बसून ठेवण्यात आले होते.निसर्ग नियमानुसार त्यात १२/१३ आध्यात्मिक ओबीसी भक्त मृत्यूमुखी पडले आणि पांचशे पेक्षा जास्त आध्यात्मिक भक्त विज्ञानाच्या दवाखान्यात दाखल करण्यात आले होते.यातून त्यांनी आणि इतरानी कोणता धडा घेतला तो दिसत नाही.

ओबीसीना संविधानात दिलेले हक्क संवैधानिक अधिकाराचा एकाबाजूला उपभोग घ्यायचा आणि दुसरीकडे संविधान संवैधानिक अधिकारा बद्दल सुतार समाजात वैचारिक समाज प्रबोधन करायचे नाही,याला तर निव्वळ दुटप्पीपणा म्हणतात.वास्तविक पाहता डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा ज्योतिबा फुले,राजर्षी शाहु महाराज,राष्ट्रमाता जिजाऊ,शिवराय या सर्वंच महापुरुषांनी बहुजन समाजाला जागृत करण्यासाठी आपलं संपुर्ण आयुष्य खर्ची घातले.याच महापुरुषांच्या विचारांचा प्रसार प्रचार ओबीसी विश्वकर्मीय सुतार समाजात होतांना दिसत नाही.महिलांना शिक्षणाचे महत्व पटवुन देणारे फुले दांपत्य ओबीसी समाजातील एक घटक असतांना ओबीसी समाजाने आज ही त्यांना मनापासून स्वीकारले नाही.उलट उच्चवर्णीय समाजाने त्यांच्या महिलांना शिक्षणाची दारे उघडे करून सर्वच क्षेत्रात गरुड झेप घेतलेली दिसते.ओबीसी समाजातील किंवा सुतार समाजातील किती महिला शिक्षण घेऊन उच्चपदावर अधिकारी म्हणून बसल्या हे गर्वाने सांगता येत नाही.ही शैक्षणिक वैचारिक कमतरता आहे हेच 'विश्वकर्मीय' सुतार समाजाचे दुर्दैव आणि शोकांतिका म्हणावी लागेल.



ओबीसी सुतार समाजात महापुरुषांच्या विचारांची नितांत गरज आहे.सुतार समाजात ओबीसी संविधान जनगणना बद्दल समाज प्रबोधन न करता धार्मिकतेचा प्रचार प्रसासावर जास्तीत जास्त प्रमाणात जोर दिला जातो.राम मंदिर आंदोलन करण्यात सर्वात जास्त संख्या ओबीसी ची होती. त्यांना काय प्रतिनिधित्व मिळाले हे विचारण्याची वैचारिक शक्ति एका ही ओबीसी नेत्यात नाही.तरी तो आज ही उद्घाटन सोहळ्याची तयारी करण्यात गावागावात पुढे आहे.आध्यात्मिक धार्मिकता ही वैयक्तिक पातळीवर असावी हा ज्याचा त्याचा अधिकार आहे असे सांगितल्या जाते. मग विशिष्ट समाजाला सर्वच क्षेत्रात त्यांना प्राधान्य का दिल्या जाते.त्यानुसार त्याचा सुतार समाजाला राजकीय हिस्सेदारी साठी कितपत उपयोग होईल याचा सुद्धा विचार करण्याची नितांत गरज आहे याकडे समाजातील सुशिक्षित उच्चशिक्षित बुद्धिप्रामाण्यवादी बुद्धिजीवी सर्वगुणसंपन्न लोकांनी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा फुले,सावित्रीबाई फुले,रावबहादुर नारायण मेंघाजी लोखंडे,राजर्षी शाहूमहाराज आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,मान्यवर कांशीराम यांच्या क्रांतिकारी विचारांची चळवळ म्हणजेच बहुजन चळवळ समजली जाते.ती एका जाती धर्माशी नाते सांगणारी नाही, तर बहुजन हिताय बहुजन सुखाय हा संदेश देणारी आहे.म्हणून ओबीसीशी तिच्या सोबत जोडून घेतले पाहिजे होते.ते न घेतल्यामुळे शिक्षणातील,नोकरीतील आणि राजकीय आरक्षणाला त्यांना मुकावे लागत आहे.म्हणूनच भिती वाटते की ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासुन अडगळीत पडेला तर त्याला कोणीच वाचवायला येणार नाही.मनोज जरांगे पाटील ज्या पद्धतीने ओबीसी तून आरक्षण मागत आहे. आणि सरकार त्याच्यापुढे झुकत आहे. हे पाहता भविष्यात ओबीसी ची हालत काय असणार आहे,याचा विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील सर्वात मोठा घटक असणाऱ्यानी केला पाहिजे.

४५ ते ५० लाख लोकसंख्या असलेल्या ओबीसी सुतार समाजात कर्तबगार कर्तृत्ववान सुशिक्षित उच्चशिक्षित बुद्धिप्रामाण्यवादी बुद्धिजीवी बुद्धिवान समाज जाणकार समाजाचा गाढा अभ्यास असणाऱ्या विचारवंत आणि विद्वानांनी विकासात्मक आणि विविध विषयावर समाज प्रबोधनात्मक समाजकार्य करण्यासाठी किमान २०० (दोनशे) च्या जवळपास समाज संघटना समाज संस्था स्थापन केलेल्या असतील आणि विश्वकर्मीय सुतार समाजात हिरीरीने कार्यरत सुद्धा असतील असा माझा अंदाज आहे. समाज नेतेपदासाठी गुडघ्याला बाशिंग बांधलेले उतावीळ झालेले बघायला मिळतील दगडालाच शेंदूर फासला तर त्यामधून ओबीसी सुतार समाजात खऱ्या अर्थाने परिपुर्ण सुतार समाज नेतृत्व निर्माण होणार नाही. त्यासाठी सामाजिक वैचारिक आणि नैतिक दृष्टीने सर्वगुणसंपन्न गुणवत्ता असणे गरजेचे आहे.परंतु,यांच्याकडे वैचारिक दृष्टीने परिपक्वतेचा भलामोठा अभाव जाणवतो सुतार समाजात वैचारिक बैठक नसल्याने समाजात सत्ता संपत्ती ज्ञान,संविधान,ओबीसी,जनगणना या महत्वाच्या विषयावर समाजात वैचारिक दुष्ट्र्या समाज प्रबोधन होतांना दिसत नाही.राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात असंख्य सुशिक्षित उच्चशिक्षित बुद्धिमान बुद्धिजीवी लोकांची संख्या लक्षणीय समजली जाते ओबीसी सुतार समाजात सुशिक्षित शिक्षित उच्चशिक्षित वर्गाची संख्या प्रचंड प्रमाणात आहे.ओबीसी सुतार समाजात सत्ता संपत्ती ज्ञान,राजकीय हिस्सेदारी प्राप्तीसाठी समाजात ओबीसी,संविधान,जनगणना इत्यादी विषयावर समाजातील सुशिक्षित उच्चशिक्षित लोकांनी समाजात वैचारिक प्रबोधन करणे गरजेचे आहे त्या शिवाय सुतार समाजात समाज जागृती निर्माण होणार नाही पर्यायाने ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासून दुर जाईल याचा गांभीर्याने विचार करण्याची समाजाला नितांत गरज आहे. म्हणूनच मी विचारतो विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील सर्वात मोठा घटक कुठे आहे?.

देशात सर्वात मोठी संख्या असणाऱ्या ओबीसी समाजाचे राजकीय,शैक्षणिक आणि नोकरीचे आरक्षण काढून घेतल्यावर ही एकूण ओबीसी समाजात मोठी खळबळ अपेक्षित होती.पण ओबीसी समाजातील कोणत्या ही जातीने समाजात जाऊन याबाबत जनजागृती प्रबोधन केल्याचे फारसे दिसले नाही.राजकीय पक्षाचे गुलाम कार्यकर्ते आणि नेते स्वार्थासाठी गांधीजीच्या तीन माकडासारखे बसले आहेत.आध्यात्मिकदृष्ट्र्या जागृत असलेला ओबीसी शैक्षणिक,सामाजिक,राजकीयदृष्ट्र्या किती अज्ञानी आहे हे खारघरच्या धर्माधिकारी यांच्या महाराष्ट्र भूषण सोहळ्याने दाखवून दिले आहे.त्यांनंतरच मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसी तून आरक्षण पाहिजे हा अट्टयास धरून जोर लावला आज खेड्या पड्यातील मराठा समाज त्यांच्या बाजूने उभा राहून शक्ति प्रदर्शन करीत आहे. आपण ओबीसी कुठे आहोत?. आजच्या घडीला ४५ ते ५० लाखाच्या उच्च सुशिक्षित तरुणातील सुक्ष्म चिकित्सक मेल्याचे स्पष्टपणे दिसते.अज्ञान अंधश्रद्धा बाबत सुजाण ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रात कोणत्याच गोष्टींची कमतरता अजिबात जाणवत नाही. सुतार समाजात राज्यभरात सर्वगुण संपन्नता गुणवंता कोणती?.हे कोणालाच मोजता येत नाही.सुतार समाजात सामाजिक क्षेत्रात वैयक्तिक पातळीवर प्रगतीला अजिबात महत्व दिले जात नाही.हे अगोदर सर्वप्रथम मी सामाजिक दृष्टीने मुद्दामच समाजाला जाहिर पणे सांगतो. समाजहित कशात आहे हे जाहीर स्पष्ट करतो.ओबीसी सुतार समाज नेत्यांनी समाजहितासाठी वैचारिक प्रबोधन करण्यासाठी जमिनीवर उतरणे गरजेचे आहे.जनजागृती,वैचारिक प्रबोधन करण्यासाठी समाजहिताचे महत्व लक्षात घेऊन सजग राहीले पाहिजे.हे दिसत नसल्यामुळे माझ्या सारख्या खेड्यातील अडाणी आणि सामाजिक क्षेत्रातील कोणत्याही पदावर नसलेल्या कार्यकर्त्याला हे समाज बांधिलकी म्हणून मांडावे लागत आहे.मी कोण ?. आणि माझ्या विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील सर्वात मोठा घटक कुठे आहे?.

ओबीसी सुतार समाजातील सामाजिक क्षेत्रातील अनुभवी,मुरब्बी,प्रख्यात परखडपणे पत्रकारिता करणारे मान्यता प्राप्त मुद्दे समजणारे मुद्दा सोडुन सोयीनुसार पळवाट न शोधणारे,सुशिक्षित उच्चशिक्षित,चाणाक्ष,चतुर,चिकित्सक बुद्धिप्रामाण्यवादी इथं शब्दफेक करणारे शब्दप्रयोग करून शब्दप्रामाण्यवादी नको असे दिग्गज धुरंधर,मातब्बर भाषेवर प्रभुत्व असलेले नेते कार्यकर्ते आज समाजात दिसत नाही.आणि असतील तर त्यांनी ओबीसी सुतार समाज नेत्यांनी समाजहितासाठी जमिनीवर उतरणे गरजेचे आहे.अन्यथा ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासुन अडगळीत पडेल. ओबीसी सुतार समाजातील सन्माननीय पत्रकार,संपादक,समाजसेवक,विचारवंत बुद्धीजीवी यांनी प्रथम बहुजनाची वैचारिक चळवळ म्हणजे काय ती समजून घ्यावी.आध्यात्मिकदृष्ट्र्या त्याग,समर्पण सेवा देणारे नकारात्मक विचार झटकुन टाका.आणि सकारात्मक विचाराने बहुजन हिताय,बहुजन सुखाय विचाराने राज्यभरातील जिल्हा,तालुका गावागावात जाऊन वैचारिक प्रबोधनाचे काम करावे,ओबीसी सुतार समाज नेत्यांनी समाजहितासाठी गावागावातील जमिनीवर उतरून काम करण्याची गरजेचे आहे.अन्यथा ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासुन अडगळीत पडेल.यासाठी समाजाने सुद्धा जागृत असणे आणि चिकित्सक होऊन चिकित्सा करणे गरजेचे आहे.

ओबीसी,संविधान जनगणना,संवैधानिक अधिकार,सत्ता संपत्ती ज्ञान इत्यादी बद्दल आपापल्या संकुचित विचारांचे ज्ञानाचा ज्ञान भांडार बंद करा,आणि विशाल ज्ञानाच्या ज्ञान महासागरातून अज्ञान दूर करणारे ज्ञान विज्ञान संपादन करा.ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रात राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाज जागृती मेळावा समाज आंदोलन होईल.ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रात सत्ता संपत्ती ज्ञान आणि संविधान,जनगणना बद्दल समाज जागृती निर्माण करणे,संवैधानिक अधिकार,राजकीय हिस्सेदारी,ओबीसी बद्दल तसेच अन्य विषयावर समाजात समाज प्रबोधनात्मक सामाजिक वैचारिक आणि नैतिक दृष्टीने जबाबदारी कोणाची यासाठी ओबीसी सुतार समाज नेत्यांनी समाजहितासाठी जमिनीवर उतरणे गरजेचे आहे.अन्यथा ओबीसी सुतार समाज बहुजन चळवळी पासुन अडगळीत पडेल.तेव्हा विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील सर्वात मोठा घटक कुठे आहे?.असे विचारले जाईल.

कारण आपणच तर ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रातील खऱ्या अर्थाने विकासात्मक योजना घेऊन समाजाचे ओबीसी सुतार समाजाचे वैचारिक प्रबोधन करू शकलो नाही.तर आध्यात्मिक विचारांचे कलम कसाई ओबीसी ना मानसिक वैचारिक गुलाम बनविण्यात यशस्वी होतांना दिसत आहेत. आईच्या पोटातून नेता,कार्यकर्ता म्हणून जन्मा येत नाही.समाजात राहून अन्याय अत्याचार,अज्ञान अंधश्रद्धा यावर प्रहार कसे करावे ते शिकावे लागते.त्यानंतरचं ओळख निर्माण होते.मी कुठे पत्रकार लेखक म्हणून प्रसिद्ध होतो.सोशल मिडीयावर मनाला जे जे चांगले वाईट वाटते,दिसते त्यावर लिहत राहिलो.एकमेव सत्यशोधक आंबेडकरी चळवळीतील कामगार नेते बहुजन चळवळीसाठी विविध विषयावर अभ्यासपुर्ण समाज प्रबोधनात्मक लिखाण करणारे परखड पत्रकार आणि उत्तम लेखक साहित्यिक आदरणीय सागरजी तायडे यांच्या मी संपर्कात आल्यामुळे सागर तायडे यांच्यामुळेच राज्यातील साठ वृत्तपत्रात माझ्या सारख्याचे लेख प्रसिद्ध होत आहेत.अशी मैत्रीभावना सत्यशोधक आंबेडकरी विचारांच्या बुद्धीजीवी माणसांत आहे तीच मैत्रीभावना ओबीसी सुतार समाजातील बुद्धीजीवी माणसांत का दिसत नाही? ती निर्माण करण्याची प्रेरणा मला मिळाली. म्हणूनच मी लिहतो ओबीसी सुतार समाज नेत्यांनी समाजहितासाठी गावपातळीवर जमिनीवर उतरून वैचारिक समाज प्रबोधन करावे. याला सामाजिक वैचारिक नैतिक दृष्टीने जबाबदार कोण याचा सुद्धा सद्विवेक बुद्धीने विचार करणे गरजेचे आहे,आवश्यक आहे.



आध्यात्मिक चक्र व्युवात फसलेल्या ओबीसी सुतार समाजाला बाहेर काढून सामाजिक क्षेत्रात खऱ्या अर्थाने जमिनीवर शैक्षणिक,सामाजिक वैचारिक व विकासात्मक चळवळ नेली पाहिजे.ओबीसी सुतार समाज जागृती अभियान जोरात राबविण्यासाठी तन,मन,धनाने जमिनीवर उतरणे गरजेचे आहे.त्यासाठी तोंडात साखर,पायाला भिंगरी आणि डोक्यावर बर्फ ठेवावे लागेल.तरच ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रातील नेते कार्यकर्ते साधारणतः दोन वर्षात ओबीसी सुतार समाजाचे सामाजिक क्षेत्रातील राज्यातील मान्यताप्राप्त नेते होऊन बहुजन चळवळीशी जोडल्या जातील. विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील सर्वात मोठा घटक असल्यामुळे नेतृत्व करण्याची संधी उपलब्ध होईल.

सुशिक्षित बेरोजगार युवकांना नोकरी,छोटे मोठे उद्योग सर्वसामान्य समाज बांधवांना व्यवसाय आणि रोजगार निर्मिती नसेल तर आर्थिकदृष्ट्र्या प्रगती कशी होईल.मागीतल्याने मिळत नाही,संघर्षा शिवाय पर्याय नाही. हे ओबीसी समाजाच्या कार्यकर्त्याला नेत्याला माहितीच नाही.असे मला वाटते.५२ टक्के ओबीसी समाजाचे राज्यव्यापी आंदोलन उभे का राहत नाही.कारण विहिरीत नाही,तर पोहऱ्यात कसे येणार ? मग मला अडाण्याला सांगा ओबीसी सुतार समाज नेत्यांनी समाजहितासाठी जमिनीवर न उतरता समाजाचे समाज मान्य समाज नेते कसे बनतील? आणि बहुजन चळवळीशी कसे जोडल्या जातील याचा विचार करणे नितांत गरजेचे आहे.

ओबीसी सुतार समाजाने डोळे बंद करून द्या टाळी आणि घ्या टाळी तुझ्या गळा माझ्या गळा गुंफू फुलांच्या माळा हेच समाजकार्य नसते.सामाजिक क्षेत्रातील सत्यावर आधारित तर्कशुद्ध समाज तत्वाच्या आधारावर तसेच सामाजिक वैचारिक आणि नैतिक मूल्यांच्या आधारावर समाज संघटना उभी राहिली तर इतिहासात तिची नोंद होईल अन्यता ५२ टक्के ओबीसी जातीतील किती टक्के जागृत होते हा इतिहास लिहला जाईल.यासाठी मला कोणी मुर्ख म्हटले तरी मी माझे मत मांडत राहतो,कदाचित ते चुकीचे असू शकते.पण ते कसे चुकीचे आहे हे मला कोणी छातीठोक पणे समजावून सांगितले पाहिजे हीच माझी इच्छाशक्ती आहे.म्हणूनच विनंती करतो बाबानो ओबीसी सुतार समाज नेत्यांनी समाजहितासाठी जमिनीवर उतरणे गरजेचे आहे.आणि बहुजन चळवळीशी जुळून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील सर्वात मोठा घटक कुठे आहे?.ते दाखवून द्यावे लागेल.निर्भीड निपक्षपाती प्रतिकिर्याची अपेक्षा करतो.

जय संत भोजलिंग,जय ओबीसी.जय संविधान.समाज जागृती अभियान अंतर्गत.

प्रमोद सूर्यवंशी चिखली मातृतीर्थ बुलडाणा-८६०५५६९५२१

# शिबिर भान तरुणाईचे - स्त्रोत युवकांच्या ज्ञानाचे, संस्काराचे आणि कौशल्याचे

बीड जिल्ह्यातील गेवराई येथील छोट्याशा गोविंदवाडी गावाजवळ असलेले सहारा अनाथालय ज्याची स्थापना २००४ साली संतोष गर्जे यांनी केली. १२७ मुलांचे छत आणि या मुलांचा पालक एक अद्भुत व्यक्तिमत्व, अशक्य ते शक्य चा प्रवास, जीवन जडण-घडणीचा प्रवास, प्रेमाची माया, वात्सल्य, आधार, संघर्ष व त्यागाची अनन्य साधारण मूर्ती म्हणजे संतोषदादा गर्जे आणि प्रीतीताई गर्जे. आई फाउंडेशन अंतर्गत चालवले जाणारे प्रकल्प म्हणजे बालग्राम, युवाग्राम, कृषीग्राम. स्व-प्रेरणेतून चालवले जाणारे शिबिर म्हणजे भान तरुणाईचे शिबिर हे ११-जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आले होते. या भान तरुणाईच्या शिबिराला महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील १३४ शिबिरार्थींचा समावेश होता. युवकांना कौशल्य पूर्ण करणे युवकांमध्ये ज्ञान आणि संस्कार आणि संस्कार जोपासणे या महत्वपूर्ण भूमिकेतून भान तरुणाईचे शिबिर आयोजित केले होते. शिबिरामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रातील नावलौकिक असलेले सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व उपस्थित होते. युवकांनी आपल्या ज्ञानाच्या कक्षा कशाप्रकारे उंचावल्या पाहिजेत, स्वतःच्या कौशल्यामध्ये पूर्णत्व प्राप्ती करण्यासाठी किती अथक परिश्रम



केले पाहिजेत याबद्दल सखोल मार्गदर्शन प्रा. इंद्रजीत भालेराव (परभणी), मा. वर्षाताई विद्या विलास (मुंबई), मा. निलेश सूराणा (संभाजीनगर), मा. प्रशांत देशपांडे (संभाजीनगर), मा. अमर हबीब काका, सुहास सरदेशमुख यांच्या वतीने करण्यात आले. या शिबिरामध्ये विविध क्षेत्रातील उपजत समस्या व त्यांचे निवारण आणि त्या निवारणामध्ये युवकांची भूमिका कशाप्रकारे असेल, युवकांकडील ज्ञानाचे स्त्रोत समाज उपयोगी कसे होतील, या बाबतीत शिबिरामध्ये यथोचित मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शिबिराच्या माध्यमातून मन्यारवाडी या गावात श्रमदान करण्यात आले. श्रमदान झाल्यानंतर पथनाट्याच्या माध्यमातून बेटी पढाव बेटी बचाव, ग्रामविकास, बालविवाह बंदी याविषयी पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. एकूणच युवकांनी समाजातील विविध समस्यांचे निवारण करण्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित आहे. आपल्या कौशल्याच्या माध्यमातून समाज, गाव आणि राष्ट्र विकासामध्ये अमूल्य योगदान देणे अपेक्षित आहे. या शिबिराच्या माध्यमातून ही जाणीव जागृती निश्चितीच युवकांमध्ये होईल यात तिळमात्र शंका नाही.

अनाथांचा नाथ बनलेल्या संतोषदादा गर्जे व प्रीतीताई गर्जे यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा..!

दिपक प्रल्हाद पाटे

शिबिरातील सहभागी शिबिरार्थी

# बावीस जानेवारी नव्हे, बावीस प्रतिज्ञा !

तमाम बहुजनांना 'गर्व हे कहो' म्हणायला लावून गरजेच्या वेळी त्यांना 'हिंदू' चा जामा चढवायचा आणि आपली गरज संपताच त्यांना पुन्हा त्यांच्या जातीचा अंगरखा घालायला बाध्य करायचे असा आजपर्यंत धंदा मांडलेल्या व्यवस्थेतील मुख्य सूत्रधारांना सत्तेची चट लागली असल्यामुळे हाती असलेली सत्ता पुन्हा एकदा आपल्याकडेच राखण्यासाठी 'गर्व से कहो' म्हणून ज्या धर्माचा उल्लेख करतात त्या हिंदू धर्माचे केवळ प्रमुख नव्हे, तर ज्यांच्या मुखातून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द प्रमाण मानण्याची प्रथा रुढ आहे त्या चारही पीठाचे शंकराचार्य हे धर्मशास्त्रानुसार अयोध्या येथे अर्धवट बांधकाम झालेल्या राम मंदिराचे उदघाटन आणि त्यात श्रीरामाच्या मूर्तीची प्राण प्रतिष्ठा करणे हे चुकीचे आणि अवैध आहे असे सांगून धर्मशास्त्रानुसार तो कार्यक्रम धार्मिक नसून श्रेयवादी भूमिकेतून येऊ घातलेली सार्वत्रिक निवडणूक डोळ्यासमोर ठेवून लगबगीने आयोजित करण्यात आलेला केवळ आणि केवळ एक राजकीय कार्यक्रम असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून त्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे स्पष्टपणे नाकारले आहे .

संघ, भाजप, आणि सरकारचा घसा कोरडा पडेपर्यंत अहोरात्र प्रचारात गुंतलेले प्रसार माध्यमातील विकले गेलेले सर्व घटक ,व्हॉटस ऍप ग्रुप,आयटी सेलच्या टीमने हा कार्यक्रम राजकीय असतानाही जणू मोदींनीच साक्षात प्रभू रामाला वनवासातून परत आणल्याच्या आविर्भावात प्रचार यंत्रणा राबवत आहेत. जळी स्थळी काष्टी पाषाणी ईश्वर वसलेला असतो असा उपदेश पाजळणा-यांनी त्रिकाल सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञ असलेल्या प्रभू रामाला कुणी का असेना हजारो वर्षांपासून बंदीवासात ठेवले होते ते मोदींनीच पुनर्जीवित केले असा डांगोरा का पिटत असतील याचे उत्तर राजकीय महत्त्वाकांक्षा याशिवाय दुसरे असूच शकत नाही. असो!

तुलसीदास प्रभू रामाच्या जन्माबद्दल बोलताना प्रभू राम स्वतः प्रकट झाले असे म्हणतात यावरुन प्रभू राम हे ऐतिहासिक नसून मुख्यतः पौराणिक आहेत. हे कोणत्याही तर्कशुद्ध माणसाला समजू शकते. तसे अयोध्येचे भौगोलिक स्थान वादग्रस्त असूनही प्रभू राम तेथे जन्माला आल्याच्या पौराणिक कथेच्या एव्हीलवर टायटल डीडवर सर्वोच्च न्यायालयात निर्णय घेतला गेला असल्याने मंदिरचे काम अग्रक्रमाने केले जाते आहे.

भाजपला खरोखरच श्रीरामांबद्दल आस्था असती तर प्राण प्रतिष्ठा करून अभिषेक करण्यासाठी हिंदू धर्म प्रमुख अर्थात चारही शंकराचार्य यांच्याकडे सर्व पदभार सोपवता आले असते .पण, सार्वत्रिक निवडणुका तोंडावर असताना निवडणुकीत आपल्या लाभाचा विचार न करता मोदी ते इतरांकडे सोपवतीलच कसे ? मुस्लिमांना शिक्षणाऐवजी हज सबसिडी दिली जायची म्हणून ते काँग्रेसला भरभरून मतदान करत होते असा कयास बांधून नोकऱ्या, शिक्षण किंवा आरोग्य सेवा ऐवजी श्रीरामाचे मंदिर बांधून पौराणिक हिंदू गौरव प्रदान होत असेल तर गर्व से कहो म्हणणारे हिंदू आणि हिंदूंचा जामा ओढलेले बहुजन भाजपला मतदान करणारच हा खुळा विश्वास बाळगून मंदिर उदघाटनाचा घाट घातला गेला आहे. आजचा कुठल्याही हुकूमशहा लोकशाही मोडून काढण्यासाठी सशस्त्र दलाचा वापर करत नाहीत. त्यासाठी धर्म हा जनतेचा अफू आहे या मार्क्सच्या म्हणण्यात म्हणून तर दम आहे याची खात्री पटते. वास्तविक देऊळ/मंदिरं बांधणे ही राजेशाहीत सहज वाटणारी गोष्ट आहे.मात्र देश स्वतंत्र झाल्यानंतर लोकशाही प्रणालीचा स्वीकार करून जगातील एक आदर्शवत असे लोकशाही, आणि धर्मनिरपेक्ष तत्व अनुसरुन भारतीय संविधान लागू झाल्यावर आज एका विशिष्ट धर्माचे प्रतिक म्हणजे मंदिर बांधण्यात लोकशाही, धर्मनिरपेक्ष सरकारचा प्रत्यक्ष सहभाग असणे हा आपल्या भारतीय संविधानाच्या प्राथमिक नियमाच्या विरुद्ध आहे.मुळातच साकेत अर्थात अयोध्या परिसरात कोणत्याही कारणास्तव ज्या ज्या वेळी खोदकाम करण्यात आले आहे, येते आहे तेंव्हा त्याठिकाणी केवळ आणि केवळ बुद्धांच्या मूर्ती,स्तूप,स्तंभ आदी बुद्धकालीन अवशेष मोठ्या प्रमाणात आढळून आले आहेत.ही गोष्ट सरकारच्या पुरातन वस्तू व अवशेष जतन करणा-या विभागाने विशेष महत्त्वाची समजून नोंद घेणे आवश्यक होते. परंतु तसे झालेले नाही.

कीकडे धर्म पीठाचे शिरोमणी समजले जाणारे चारही पीठाचे शंकराचार्य बावीस जानेवारीच्या कार्यक्रमालाच अवैध ठरवत असताना अलिकडे एका बैठकीत संघाच्या व्यासपीठावरुन बोलताना भारतीय बौद्ध संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संघप्रिय भंते राहुल बौद्ध यांनी अयोध्या येथे श्रीराम मंदिरचे उदघाटन आणि प्राण प्रतिष्ठा करण्याच्या दिवशी बौद्धांनी ही आपल्या घरावर रोषणाई करुन दिवे लावावेत असे अनावश्यक आवाहन करुन मुठभर मुस्लिम मौलवींनी मोहन भागवताना राष्ट्रपिताचा दर्जा देण्याचा जो आगाऊपणा केला होता त्याच धर्तीवर आपली अक्कल पाजळली आहे.

विश्व भूषण बाबासाहेब डॉ भीमराव आंबेडकर हे उच्चशिक्षित असूनही त्यांनी भोगलेल्या यातना,मनस्ताप त्यांना आलेले अनुभव याचे मूळ उगमस्थान हे विषमतेवर आधारित जाती व्यवस्थेने भरलेला 'हिंदू' धर्म आहे हे ओळखले होते.म्हणून त्यांनी एकोणीसशे पस्तीस मध्ये येवला येथे एक ऐतिहासिक निर्णय घेतला आणि जाहीर घोषणा केली की,' मी हिंदू म्हणून जन्माला आलो हा नियतीचा निर्णय आहे हे जरी खरे असले तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही हा माझा दृढ निर्णय आहे.'

बाबासाहेबां सारखे विचारवंत एवढ्या टोकाचा निर्णय घ्यायला तयार झाले हेच हिंदू धर्मातील तत्वं कळण्यास पुरेसं आहे. त्यानंतर जवळपास मधले एकवीस वर्षांचा काळ होता खरोखरच जर हिंदु धर्मात बाबासाहेबांना अपेक्षित असा माणुसकीचे अस्तित्व मानणारे बदल झाले असते तर कदाचित बाबासाहेबांनी येवला येथे घेतलेला निर्णय बदलला असता. परंतु ज्या धर्मात कोट्यवधी बालकं उपासमारीने तडफडून मरत असताना भाकडकथा पोथी पुराणात सांगितले आहे म्हणून लाखो लिटर दूध आणि तेलाचा अभिषेक दगडांच्या मूर्तीवर केला जात असेल तर केवळ बाबासाहेब डॉ.भीमराव आंबेडकरांचे अनुयायीच नव्हे तर समस्त बहुजनांनी देखील अशा हिंदुत्वाचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे.त्यासाठी देव आणि जात मुक्त भारत हा एकमेव मार्ग असून भारतीय बौद्ध संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संघप्रिय भंते राहुल बौद्ध यांनी बावीस जानेवारीला अयोध्या येथे होणा-या कार्यक्रमासंबधी केलेले आवाहन कुणीही अंमलात न आणता ते धुडकावून लावावे.

तशी श्रद्धा आणि आस्था पाळणे ही ज्याची त्याची वैयक्तिक बाब मानली तरी इथल्या बहुजनांच्या अवनतीचे एकमेव कारण म्हणजे बहिष्कृतता, अज्ञान व दारिद्र्य यात आहे. या घटकांनाही समान सामाजिक दर्जा, शिक्षणाच्या संधी मिळून त्यांना उद्योग प्रवर्तक करून स्वयंरोजगारी बनविले पाहिजे याचा विचार रामाने कधी केला नाही अथवा राम राज्यात कधीही केला गेला नाही.श्रीरामाने मनात आणले असते तर त्यांनी या भूमीवर विषमताच निर्माण होऊ दिली नसती. त्यामुळे इथल्या सामान्य माणसालाही ते आपल्या पायावर उभे करण्याचे महान कार्य करू शकले असते.परंतु असे कधी घडले नाही मग अशा श्रीरामा बद्दल इथल्या बहुजनांनी पुज्य भाव का म्हणून धारण करावे आणि आपल्या पुढच्या पिढ्यांच्या मनात तरी त्यांच्या विषयी देवत्वाची भावना का म्हणून जागवत ठेवावी ? हे विचारपूर्वक समजून घेण्याची गोष्ट असून बाबासाहेब आंबेडकरांनी जरी बौद्धांना आवाहन केले असले तरी तमाम बहुजनांनी देखील त्यांनी खाली दिलेल्या बावीस प्रतिज्ञा अंमलात आणणे ही काळाची गरज बनली आहे.

१- मी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांना मानणार नाही किंवा त्यांची पूजा करणार नाही.

२-देवाचे अवतार मानल्या जाणार्या राम आणि कृष्ण यांच्यावर माझा अजिबात विश्वास नाही, त्यांची पूजाही करणार नाही.

३-मी गौरी, गणेश, लक्ष्मी, दुर्गा, काली, सरस्वती, संतोषी, हनुमान आदी इतर हिंदू देवतांवर विश्वास ठेवणार नाही. मी त्यांची पूजा करणार नाही.

४-माझा देवाचा अवतार यावर विश्वास नाही.

५-मी भगवान बुद्ध हे विष्णूचे अवतार होते यावरही कधीच विश्वास ठेवणार नाही. मी हा शुद्ध खोटा प्रचार मानतो.

६-मी श्राद्ध घालणार नाही, पिंड दान देणार नाही. मृत्यु भोजन देणार नाही आणि कोणाच्याही मृत्यूच्या मेजवानीत जेवणार नाही.

७-मी बुद्धाच्या तत्त्वांचे आणि शिकवणुकीचे उल्लंघन करणार नाही.

मी ब्राह्मणांकडून विवाह, नामकरण, घरोघरी वार्मिंग, कथा भागवत, पूजापाठ, हवन, शुभ मुहूर्त इत्यादी कोणतेही विधी आयोजित करणार नाही.

८-ब्राह्मणांनी केलेला कोणताही समारंभ मी स्वीकारणार नाही.

मी होळी, दिवाळी, दसरा, रक्षाबंधन, छठ पूजा, नवरात्री, शिवरात्री, कृष्ण जन्माष्टमी इत्यादी कोणतेही सण साजरे करणार नाही.

९-माझा मानवाच्या समानतेवर विश्वास आहे.

१०- मी समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करेन.

११-मी बुद्धाच्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.

१२-मी बुद्धाने ठरवलेल्या मापदंडांचे पालन करीन.

१३ - मी सर्व प्राणिमात्रांवर करुणा आणि प्रेमळ दया करीन आणि त्यांचे रक्षण करीन.

१४-मी चोरी करणार नाही.

१५-मी खोटं बोलणार नाही.

१६ - मी कामुक (अनाचार, व्यभिचार) पाप करणार नाही.

१७-मी कच्चे, शिजवलेले, दारू, मादक पदार्थ इत्यादींचे सेवन करणार नाही.आणि मी कधीच कंवरला घेऊन जाणार नाही.

१८- मी त्याला बौद्ध धर्माच्या तीन घटकांवर - ज्ञान, नम्रता आणि करुणा यांच्या आधारे तयार करण्याचा प्रयत्न करेन.

१९-मानवतेला हानीकारक आणि असमानतेवर आधारित असणा-या मानवतेच्या प्रगतीला आणि विकासाला बाधा आणणारा हिंदू धर्माचा मी त्याग करतो आणि माझा स्वधर्म म्हणून बौद्ध धर्म स्वीकारतो.

२०-माझा ठाम विश्वास आहे की बुद्धाचा धम्म हाच खरा धर्म आहे.

२१-या धार्मिक परिवर्तनाद्वारे).

माझा पुनर्जन्म होत आहे यावर माझा विश्वास आहे .

२२-मी प्रतिज्ञापूर्वक आणि ठामपणे घोषित करतो की मी माझे जीवन बुद्ध आणि त्यांच्या धम्माच्या तत्त्वांनुसार आणि शिकवणीनुसार मार्गदर्शन करीन.

बावीस जानेवारीच्या अनुषंगाने भारतीय युवकांचे प्रेरणास्थान समजले जाणारे स्वामी विवेकानंदांच्या अमेरिकेतील शिकागो या शहरात अठरा सप्टेंबर अठराशे त्र्याण्णव या दिवशी सर्वधर्म परिषदेमध्ये केलेल्या आणि जगभर गाजलेल्या भाषणाची आवर्जून नोंद घ्यावी लागेल. स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेतील टाळ्यांच्या गजरात केलेल्या आपल्या भाषणातअमेरिकेतील माझ्या बंधु आणि भगिनींनो या वाक्याच्या व्यतिरिक्त काय काय बोलले हे मात्र आपल्यापासून जाणीवपूर्वक लपवण्यात येते. ते आपल्याला सांगितले जात नाही. जागतिक स्तरावरील धर्म आणि संस्कृती चे विदारक सत्य कथन करताना अप्रत्यक्षरीत्या त्यांनी ब्राम्हणांनी आपल्या देशात निर्माण केलेल्या विषमतेवर आधारित जाती व्यवस्था आणि त्यानुसार त्यांच्याकडून धर्म पंथ आणि संप्रदाय यांचे वर्चस्व आणि अहंपणाने आजवर इथल्या बहुजन, वंचितांचा जगण्याचा हक्क कसा हिरावून घेतला गेला, त्यांचे जगणे असह्य करून समाज आणि मानवी संस्कृतीला कसे काळीमा फासण्यात आले हे आपले अनुभवच उघड केले होते .धर्म आणि धर्म ग्रंथाच्या आडून मनुस्मृतीच्या अमानवीय कायद्यानुसार इथल्या बहुजनांवर केले जाणा-या सर्व प्रकारच्या अन्याय/ छळांचा पाढाच त्यांनी आपल्या पाच मिनिटांच्या भाषणात वाचला. त्या एका भाषणामुळे विवेकानंद भारतात परिचित होऊन त्यांच्याभोवती अद्भुततेचे एक वलय निर्माण झाले. अशा विवेकानंदांना आज जरी डोक्यावर घेतले जात असले तरी त्या धर्म परिषदेत 'शूद्र' असल्याचे कारण सांगून त्यांना हिंदूंचा प्रतिनिधी म्हणून सहभाग नोंदविण्यासाठी परवानगी नाकारली गेली होती हे देखील सांगितले जात नाही. श्रीलंका येथील बौद्ध धर्मगुरू अनागरिक धम्मपाल यांनी आपले शिफारस आणि आपल्याला निर्धारित करुन दिलेल्या अवधितील पाच मिनिटे त्यांना दिल्यामुळे या जागतिक परिषदेत त्यांना आपले विचार व्यक्त करण्याची संधी मिळाल्यामुळे हे शक्य झाले हे विसरता येणार नाही. तरीदेखील शूद्र असा शिक्का असलेलेच आज 'गर्व हे कहो' म्हणायला पहिल्या पायरीवर हजर असतात हे इथले विदारक सत्य आहे. विद्यमान सत्ताधाऱ्यांची नियत अशी आहे की,श्रीरामाच्या नावावर सत्ता तर मिळवली मात्र रामाचा एक साधा गुणविशेष ते आदर्श म्हणून अंमलात आणू शकत नाहीत .अन्यथा सीतामाई विषयी एका सामान्य रजकने शंका उपस्थित केली तरी ते प्रजा परिक्षेला सामोरं गेले असे सांगितले जाते. इथे संपूर्ण देश निवडणूक यंत्रणे विषयी साशंक असताना आणि विशेष म्हणजे ज्या देशात विज्ञान तंत्रज्ञान विकसित असूनही आणि त्यांनी स्वतः मशीने तयार केली असताना ते संपूर्ण निर्दोष/निर्धोक नाहीत म्हणून ती मशीने निवडणुकीत वापरली जात नाहीत मात्र एकीकडे रामाचा जयघोष करत 'इवीएम मशीन वापरणे हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे' असा बाळ गंगाधरी हट्ट धरायचा याला 'राम भक्ती' म्हणता येईल का ? फक्त सत्ता मिळेपर्यंत आणि पुन्हा मिळवण्यासाठी जय श्रीराम आणि मिळाल्यानंतर त्यांच्या आदर्शांकडे ढुंकूनही पाहिले जात नाही या गोष्टीकडे देखील वैयक्तिक जातीच्या कोषातून बाहेर पडून तमाम बहुजनांनी लक्ष देणे आवश्यक आहे. शकागो येथील भाषणानंतर त्यांचे अमेरिकेत अनेक ठिकाणी भाषण झाली. त्यातील ऍनिस्कवॅम येथे भाषण देताना विवेकानंद म्हणाले होते, आजची भारताची खरी गरज देऊळ आणि धर्माची नसून विज्ञान तंत्रज्ञानाच्या साहाय्याने औद्योगिक युगाला पूरक आणि प्रेरक असे शिक्षण मिळण्याची आहे.

मात्र सव्वाशे वर्षांनंतरही आज एकविसावे शतक उजाडले असले तरी मतलबी सत्ताधारी हे धर्मनिरपेक्ष आणि सर्व धर्म समभाव हे तत्व बाजूला सारून शिक्षण व आरोग्यावरील खर्च कमी करून धार्मिक अंगाने सत्ता राबवत एका विशिष्ट धर्माचे प्रतीक असलेल्या प्रार्थना स्थळांवर अवाढव्य खर्च करत आहेत हे भारतवर्षाचे दुःख आहे.

विवेकानंद अमेरिकेतील योकोहोम या शहरातून दहा जुलै अठराशे त्र्याण्णवला त्यांच्या मित्राला पत्र लिहिताना भारतातील अंधश्रद्धा, वाईट रुढी, विषमते विरुद्ध मत व्यक्त करताना म्हणतात, आपल्या विकृत कालबाह्य रुढीमुळे आपल्याच भावंडांचा आपण अपमान करून त्यांना पशुहून वाईट वागणूक देत आलो आहोत देत आहोत. यातून बाहेर या. प्रथम माणसे बना. ज्यांचा प्रगतीला नेहमीच विरोध असतो अशा पुरोहितांना झुगारून द्या. कारण त्यांच्यामध्ये कधीच सुधारणा होणार नाही. शतको न् शतकांच्या कालबाह्य रूढी आणि इतर भावंडावर अत्याचार केलेल्यांची ही अवलाद आहे. सर्वप्रथम आसली पुरोहितशाही उखडून टाका. आपल्या बिळांमधून बाहेर पडा आणि माणसे बना . स्वामी विवेकानंद एकशे तीस वर्षांपूर्वी इथल्या तरुणांना पुरोहितशाही उखडून टाकायला सांगतात. माणसे बनायला सांगतात आणि आज मात्र इथले राजकीय नेते आपले सर्व आघाड्यांवर आलेले अपयश झाकण्यासाठी हे 'विचार चक्र' उलटे फिरवत लोकांना धर्म आणि देवळां भोवती गुंतवून धार्मिक कट्टरवाद निर्माण करून भट पांडे पुरोहितांच्या जाळ्यात ढकलून त्यांना धार्मिक कलहात अडकवून ठेवण्याचे काम करत आहेत. यामधून लोकांनी बाहेर पडून मानवतेची पताका खांद्यावर घेऊन माणूस बनण्याचा प्रयत्न करायचे आहे.इतकेच

*******************

**विठ्ठलराव वठारे**

**अंनिस, महाराष्ट्र**

# लसीकरण धोरणात गालफुगीचा नाही समावेश

नागपूर : एकीकडे शून्य ते अठरा वर्षांपर्यंतची बालके व किशोरवयीन मुला-मुलींच्या आरोग्य तपासणीसाठी 'जागरूक पालक, सुदृढ बालक' हे अभियान शासन राबवते. तर दुसरीकडे बाळांना भविष्यात 'गालफुगी' (गलगंड-मम्प्स)सारख्या आजारांपासून बचाव करण्यासाठी आवश्यक लसीकरणाचा समावेश राष्ट्रीय लसीकरण धोरणात नसल्याची माहिती उघडकीस आली आहे.लसीकरण हा बालकांच्या संगोपनातील महत्त्वाचा घटक आहे. बालमृत्यू कमी करण्याचा सोपा मार्ग आहे. १ वर्षाच्या आतील बालकाचे प्राथमिक लसीकरण पूर्ण झाल्यास रोगप्रतिकारशक्ती वाढते. बाळ जन्माला आल्यानंतर वेळेवर लसीकरण केले पाहिजे.यामुळे त्याचे अनेक आजारांपासून चे संरक्षण होऊ शकते. म्हणूनच लसीकरण ही बाळाची कवचकुंडले आहेत. असे म्हटले जाते. क्षयरोग प्रतिबंधक लस, त्रिगुणी लस, पोलिओ प्रतिबंधक डोस, गोवरची लस देण्यासाठी शासनाच्या प्राथमिक आरोग्य केंद्रापासून तर जिल्हा रुग्णालयात सोय आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातही हा लसीकरण कार्यक्रम राबवला जातो. झोपडपट्टीतील प्रत्येक नवजात शिशूला एकात्मिक बालविकास प्रकल्पाअंतर्गत लसीकरण केले जाते. मात्र गालफुगी अर्थात 'मम्प्स' या आजारावरील प्रतिबंधक लस शासनाकडूनच मोफत मिळत नसल्याची माहिती पुढे आली आहे. लसीकरणाच्या धोरणात तफावत शासनाचे लसीकरण धोरण आणि इंडियन पेडियाट्रिक असोसिएशनच्या लसीकरण धोरणात काही प्रमाणात तफावत असल्याचे दिसत आहे. शासनाच्या राष्ट्रीय लसीकरण धोरणात गालफुगीसारख्या आजारावर लस दिली जात नाही. मात्र खासगी बालरोग तज्ज्ञांची संघटना असलेल्या भारतीय बालरोग संस्थेच्या धोरणात गालफुगी नियंत्रणासाठी लसीकरण महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले आहे.

गालफुगी नियंत्रणासाठी लसीकरण : डॉ. खळतकर अलीकडे महाराष्ट्र, तेलंगण आणि आंध्र प्रदेशामधील काही शहरांमध्ये गालफुगीची प्रकरणे वाढत आहेत. संक्रमित व्यक्तींना सामान्यतः जबड्याभोवती वेदना, सूज आणि कोमलता विकसित होते, जी एका बाजूला सुरू होते.हळूहळू दुसऱ्या बाजूला समाविष्ट होते. त्यांना सूज येण्याआधी ताप, डोकेदुखी, भूक न लागणे (एनोरेक्सिया), अस्वस्थता आणि मांसपेशी दुखणे (मायल्जिया )अशी लक्षणे दिसत आहेत. नागपुरातही अशी प्रकरणे पुढे आली आहेत.हा विषाणूजन्य संसर्ग असून जबड्याभोवती लाळ ग्रंथींना प्रभावित करतो. साधारणपणे जानेवारी ते मे दरम्यान दरवर्षी तुरळक प्रमाणात हा आजार दिसतो. दर चार-पाच वर्षांनी या साथीचा उद्रेक होतो. संक्रमित व्यक्तींच्या श्वसन स्त्रावांच्या जवळच्या संपर्कामुळे त्याचा प्रसार होतो.

# कोविडसारख्या घातक विषाणूचा उंदरांवर सुरू आहे प्रयोग; चीनमुळे आणखी एका महामारीचा धोका?

कोरोना विषाणू हा सर्वात आधी चीनच्या वुहान शहरामध्ये आढळून आला होता. चीनमध्येच याची निर्मिती झाली असावी असा आरोप जगभरातील कित्येक देशांनी आतापर्यंत केला आहे. तीन वर्षांपूर्वी जगभरात हाहाकार माजवणाऱ्या कोरोनाचा कहर लोक अजूनही विसरले नाहीत. सध्या कोरोनाच्या नव्या व्हेरियंटचे रुग्ण वाढत असतानाच, चीनमधून एक गंभीर बातमी समोर आली आहे. कोविडइतक्याच घातक अशा व्हायरसवर सध्या चीनमध्ये प्रयोग सुरू आहे. बायोरेक्टिव्ह वेबसाइटवर प्रसिद्ध झालेल्या एका रिसर्च पेपरमध्ये ही माहिती समोर आली आहे. चिनी सैन्यातील डॉक्टरांनी पँगोलिन कोरोना व्हायरस नावाचा एक कोविडचा व्हेरियंट तयार केला असल्याचा दावा या रिपोर्टमध्ये करण्यात आला आहे. डॉक्टरांची टीम ही या विषाणूचा प्रयोग उंदरांवर करत आहे. एबीपीने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे. उंदरांवर भीषण परिणाम या डॉक्टरांनी काही उंदरांना या विषाणूचा डोस दिला. त्यानंतर त्यांना काही हेल्दी उंदरांसोबत एकाच पिंजऱ्यात ठेवलं. ७-८ दिवसांमध्येच निरोगी उंदरांनाही या नव्या विषाणूची लागण झाल्याचं डॉक्टरांना दिसून आलं.

# स्वाभिमानी व महान योध्दा महाराणा प्रतापसिंह.

मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी,मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहान-भूक विसरून लढा दिला.मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात कुठेही तोड नाही.प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता.त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानल्या जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे.कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्याकाळी मुगल घाबरत असे.त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे.महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला.त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह.मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले.पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले.चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहांचे निधन झाले.यानंतर मेवाडचे संपूर्ण सुत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले. जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली.अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले.त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला.परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा संग, ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल. हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल.असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले.ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाली.राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते.ही संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते.याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता. अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला.ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंहाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचसे सैनिक धाराशाही केले.दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते.महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापसिंहांच्या भितीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला.हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले.राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रतापसिंह जखमी झालेले पाहून मानसिंह अत्यंत दुःखी झाला.आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली.प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले.मानसिंहाला महाराणा प्रतापसिंह समजून मोगलांनी आक्रमण केले.अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीरला प्राप्त झाले.तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला.त्याचा पाय निकामी झाला.अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला.वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला.आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहिले,तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली.मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही.हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते. प्रतापांना हरविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमक करण्यास पाठविले.परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रतापसिंह यांना पकडू शकला नाही किंवा हरवू शकला नाही. अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.२१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला.आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे.त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात.१९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील.परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना पुण्यतिथी निमित्त कोटी-कोटी प्रणाम! जय हिंद!

****************

रमेश कृष्णराव लांजेवार

(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)

मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# सोमनाथ स्वामी डिगोळकर यांची शिवसेना (ऊबाठा) निलंगा विधानसभा प्रमुखपदी निवड

लातूर – संबंध लातूर जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, पत्रकारीता व सर्व क्षेत्राची निकडची ओळख, परिचय, अभ्यास असलेले तसेच या पुर्वी जिल्ह्यातील दिग्गज राजकीय नेत्याकडे खाजगी सचिव, जनसंपर्क प्रमुख, मिडीया प्रमुख म्हणून कार्य केलेले गत २५ वर्षापासून पत्रकारीता क्षेत्रात निडरपणे कार्यरत असणारे विशेषतः निलंगा विधानसभा मतदार संघातील निलंगा, शिरूर अनंतपाळ, देवणी तालुक्यात वैचारीका, राजकीय, सामाजिक प्रभाव असलेले नेहमी विविध सामाजिक कार्यात अग्रेसर राहणारे तसेच गत दहा वर्षापासून शिवसेना (ऊबाठा) गटाचे एक निष्ठावाण, एकनिष्ठ शिवसैनिक म्हणून पक्षवाढीसाठी कार्यतत्पर राहिलेले सोमनाथ स्वामी डिगोळकर यांची पक्षप्रमुख मा. उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेनेच्या निलंगा विधानसभा प्रमुखपदी निवड करण्यात आल्याचे पक्षाच्यावतीने घोषित केले आहे.सोमनाथ स्वामी डिगोळकर हे उच्चशिक्षीत असून ते पुर्वीपासूनच सामाजिक चळवळीत व वैचारिक, राजकीय कार्यात तसेच सामाजिक संघटना, संघटनात्मक चळवळीत प्रबोधन व समाज कार्यात सातत्याने कार्यरत राहिलेले आहेत. त्यांना लातूर जिल्ह्यातील सर्व क्षेत्राचा चांगला अभ्यास असून त्यांना निकडची ओळख आहे. त्यांनी आजपर्यंत वैचारीक राजकारण करून सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी विविध जनआंदोलनात सक्रीय सहभाग नोंदवला होता. त्याचबरोबर निलंगा विधानसभा मतदार क्षेत्राच्या,



तालुक्यातील जनतेचे प्रश्न शासन दरबारी मांडून ते सोडविण्यासाठी शिवसेनेच्यावतीने व वृत्तपत्राच्या माध्यमातून मोठे प्रयत्न केलेले आहेत. शिवसेनेच्यावतीने मागील काळात करण्यात आलेल्या आंदोलनात त्यांचा सिंहाचा वाटा राहिलेला असून महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व शिवसेनेचे पक्षप्रमुख मा. उद्धवसाहेब ठाकरे यांच्या कार्यकाळातील जनहितार्थ शासन निर्णय, लोककल्याणकारी योजनेची माहिती पक्षाच्या वतीने राबविण्यात आलेल्या शिवसंपर्क व शिवसंवाद अभियानांतर्गत त्यांनी प्रसार, प्रचार प्रसिद्धी करण्यासाठी औसा व निलंगा विधानसभा मतदार संघात आघाडीवर पक्षीय कार्य केलेले आहे. सोमनाथ स्वामी डिगोळकर यांनी आजपर्यंत निष्ठापुर्वक एकनिष्ठपणे केलेले पक्षीय संघटनात्मक कार्य पक्षवाढीसाठी केलेले आटोकाट आघाडीवरचे प्रयत्न या सदर कार्याची दखल वरिष्ठ पक्षपातळीवर, पक्षश्रेष्ठीने घेऊनच त्यांच्यावर पक्षाने निलंगा विधानसभा मतदार संघात शिवसेनेचा भावी आमदार निवडून आणण्यासाठी त्यांची विधानसभा प्रमुखपदी निवड केल्याचे बोलले जात असून त्यांच्या निवडीबद्दल निलंगा विधानसभा मतदार संघातील तिनही तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकाकडून व सर्व क्षेत्रातील मित्र परिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# उल्हासनगर महापालिकेच्या प्रत्येक विभागात बोगस कागदपत्रावर भरती झालेले कर्मचारी

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर महापालिकेतील प्रत्येक विभागा मध्ये बोगस कागदपत्रावर भरती झालेले कर्मचारी असुन या कर्मचाऱ्याना महापालिकेतच पदोन्नती सुध्दा देण्यात येते. तेव्हा हे कर्मचारी कोण कोण आहेत याचा लवकरच गौम्यस्फोट होणार असल्याची माहीती गोपनियरित्या मिळाली आहे. उल्हासनगर महापालिके मध्ये काही कर्मचारी बोगस कागद पत्राच्या आधारे नोकरी करत आहेत. महापालिकेतील सर्वच विभागात या कर्मचाऱ्यांचा भरणा झाला असुन या कर्मचाऱ्यामुळे खऱ्या कर्मचाऱ्यांची पंचायत झाली आहे. दरम्यान जे ही बोगस कागद पत्राच्या आधारे कामाला लागले आहेत. त्यांना मात्र पदोन्नंती देण्यात येत आहे . या पुर्वी बोगस कागद पत्रामुळे युवराज भदाणे यांची बदतर्फी झाली आहे. अशाच पध्दतीने जे कर्मचारी बोगस कागद पत्राच्या आधारे लागले आहेत त्यांच्या बाबत लवकरच गौम्यस्फोट होणार आहे. महापालिकेतील बहुतेक विभागात हे कर्मचारी काम करत असुन या कर्मचाऱ्यामुळे इतर कर्मचाऱ्याना त्रास होत आहे.

# इस्लापूर व राजगड प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नियमबाहय पद्धतीन घरभाडे उचलणा-या वैद्यकीय अधिका-यांची सखोल चौकशी करण्याची मागणी

किनवट, ता.प्र.शेख शौकत: इस्लापूर व राजगड(ता. किनवट) येथील प्रा.आ.केंद्रामध्य वेद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांचे निवासस्थान कोणालाही हस्तगत न करता नियमबाहय पदधतीने घरभाडे उचलत आहेत याची सखोल चौकशी करून दोषीविरुध्द कडक कायदेशिर कार्यवाही करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राज माहूरकर यांनी निवेदनाद्वारे मुख्यकार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.नांदेड यांच्याकडे नुकतीच केली आहे. निवेदनात म्हटले आहे की,प्रा. आ.केंद्र राजगड व प्रा.आ. केंद्र इस्लापूर येथिल जनमाहिती अधिकारी यांच्याकडून सन २०२० ते आजपर्यंत निवासस्थाना बाबतची माहिती माहीती अधिकारात मागीतली होती.परंतु, तेथिल जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकारात मागणी केलेली माहिती पूर्ण न देता अपूर्ण दिलेली आहे.

माहिती अधिकारात प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता प्रा. आ.केंद्र राजगड येथील वैद्यकीय अधिकारी यांचे एक निवासस्थान आहे. त्या निवासस्थानामध्ये सर्वच वैद्यकीय अधिकारी राहत असतात असे प्राप्त माहितीवरून दिसून येते,तर प्रा.आ.केंद्र इस्लापूर येथील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी निवासस्थानाची संख्या दोन असून यामध्ये एका निवासस्थानामध्ये दोन वैद्यकीय अधिकारी राहतात व दुस-या निवासस्थनामध्ये परीचर राहत असल्याचे दिसून येते.

शासनाची दिशाभूल करून घरभाडे उचलत आहेत या प्रकरणाची मुख्यकार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.नांदेड यांनी आपल्या स्तरावर सखोल चौकशी करून वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करून आवश्यक ती फौजदारी स्वरूपाची कायदेशिर कार्यवाही करावी,असे निवेदनात म्हटले आहे.निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी, गटविकास अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी, किनवट यांना पाठविण्यात आल्या आहेत.

या संदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी संबंधित वैद्यकीय अधिका-यांशि संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

# शेतीला पूरक व्यवसाय दुग्धोत्पादन, शेळी व कुक्कुटपालन व्यवसाय आणि कौशल्य विकास प्रशिक्षणाचा उपयोग .. डॉ. सुखदेव बारबुध्दे

नागपूर : – शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धोत्पादन, शेळी व कुक्कुटपालन व्यवसाय आणि कौशल्य विकास प्रशिक्षणाचा उपयोग पशुपालकांना आणि शेतकऱ्यांना त्यांचे उत्पन्न दुप्पट होण्यास पर्यायाने त्यांचा सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होईल असे प्रतिपादन डॉ. सुखदेव बारबुधे संचालक, भाकृअनुप–राष्ट्रीय मांस संशोधन संस्था हैद्राबाद यांनी केले. नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाद्वारे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर आणि भाकृअनुप, राष्ट्रीय मांस संशोधन संस्था, हैद्राबाद यांच्या वतीने अनुसूचित जाती उपघटक योजना अंतर्गत एक दिवसीय शेतकरी मेळावा व जागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात पशुपालकांच्या क्षमता बांधणीवर विशेष भर देण्यात आला. सदर कार्यक्रमांमध्ये पशुपालन क्षेत्रातील संधी व आव्हाने, भारतातील पशु मांस उद्योग आणि रोजगाराच्या संधी, पशुसंवर्धनामध्ये शेतकरी उत्पादक संघटनेची भूमिका आणि त्याचे महत्त्व, भारतातील दुग्ध व्यवसाय क्षेत्रातील संधी व आव्हाने, शाश्वत उत्पन्न व रोजगार निर्मितीसाठी शेळीपालन व्यवसायामध्ये संधी व आव्हाने इत्यादी महत्त्वाच्या विषयांवर विषय तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. विजय बसूनाथे यांनी या कार्यक्रमाच्या कार्यक्रमाच्या आयोजना मागची भूमिका विषद करतांना सांगितले की, प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्यांना योग्य तांत्रिक ज्ञान मिळते आणि त्यांना सक्षम होण्यासाठी मदत होते. सदर कार्यक्रम हा नि:शुल्क असून यात जवळपास ३५० पेक्षा




अधिक शेतकरी आणि पशुपालक यांचा सहभाग होता. सदर कार्यक्रमाप्रसंगी पशुपालन क्षेत्रात ज्यांचे बहुमूल्य योगदान आहे अशा शास्त्रज्ञ, उद्योजक, विषयतज्ञ यांचा देखील सत्कार करण्यात आला. अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन अत्यंत महत्त्वाचे असून त्यातून शेतकऱ्यांचा आणि पशुपालकांचा आर्थिक विकास साधणार असल्याचा विश्वास उपस्थित पशुपालकांनी व्यक्त केला आणि असे कार्यक्रम सतत मिळत राहावे, अशी अपेक्षाही सर्व उपस्थित पशुपालकांनी व्यक्त केली. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. सुखदेव बारबुधे, संचालक, भाकृअनुप–राष्ट्रीय मांस संशोधन संस्था, हैद्राबाद तसेच डॉ. अनिल भिकाने, संचालक, विस्तार शिक्षण, महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ, विशेष अतिथी डॉ. बस्वा रेड्डी, प्रधान वैज्ञानिक, राष्ट्रीय मांस संशोधन संस्था, हैद्राबाद तसेच डॉ. शांताराम गायकवाड, महाव्यवस्थापक, दुग्धविकास, गोविंद दूध व दुग्धजन्य पदार्थ प्रा. लि. फलटण, जि. सातारा, अध्यक्ष डॉ. आरजू सोमकुवर, सहयोगी अधिष्ठाता, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय नागपूर, आयोजक सचिव डॉ. विजय बसूनाथे, सहयोगी प्राध्यापक ई. उपस्थित होते. तसेच श्री सचिन चिकनकर, श्री गणेशजी काळे, श्री ओसामा खान, श्रीमती सुहासिनी गजभिये, श्री करण रामटेके, डॉ. उल्हास गळकाटे या शास्त्रज्ञ आणि यशस्वी दुग्धव्यवसाय, शेळी आणि कुक्कुटपालन करणाऱ्या पशुपालकांनी आपल्या अनुभवाचे कथन केले व याप्रसंगी त्यांचा सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून तयार करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते याप्रसंगी करण्यात आले. तसेच सदर कार्यक्रमांमध्ये पशुपालकांशी संवाद व चर्चा यासाठी विशेष सत्र घेण्यात आले.

# धामापूर जि.प.गटातील उबाठाच्या पदाधीकारी व कार्यकर्त्यांचा ( अजित पवार गट) जाहीर प्रवेश

संगमेश्वर/ प्रतिनिधी: तालुक्यातील धामापूर जिल्हा परिषद गटातील जनसमुदाय सावर्डे येथील आमदार शेखर निकम यांच्या जनसंपर्क कार्यालयात एकवटला होता. त्यामुळे एक नव चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. सर्व ग्रामस्थ निकम सर यांच्यावर कमालीचे खुश होते. त्यांचा संवाद, ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेऊन व गरज लक्षात घेऊन तातडीने सोडवण्याची पद्धत या सर्व गोष्टी आदर्शवत आहेत. हे सर्व ग्रामस्थांच्या डोळ्यात दिसत होते. आमदार शेखर निकम यांचे कार्यालयात आगमन होताच त्यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला. अन पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम उत्साहाच्या शिगेला पोचला आणि आमदार शेखर निकम यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेऊन धमापूर जि. प. गटातील उबाठाचे पदाधीकारी व कार्यकर्ते यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार) मध्ये प्रवेश केला. प्रवेशकर्त्यांमध्ये धामापूर जि.प.गटातील उठबाचे तुकाराम मेस्त्री (शिवसेना शाखाप्रमुख),माजी सरपंच दत्ताराम भायजे,शाखाप्रमुख गांगाराम भायजे,पडयेवाडी गावकर सजंय पडये,बोलेवाडी गावकर मधुकर बोले,पडयेवाडी माजी अध्यक्ष निलेश पडये,विजय पडये,भुसेवाडी महेंद्र कांबळे,रमेश भायजे,दिनेश पडये,रघुनाथ बोले,प्रकाश पवार,यशंवत पवार,विनोद भायजे,दत्ताराम बेंडके,तुकाराम बेंडके,पुर्ये तर्फे सावर्डे गावतील सरपंच विष्णू मांडवकर, शाखाप्रमुख शंकर घाडशी,पेवेवाडी वाडीप्रमुख बाबाजी इंजळे ,चांदाडेवाडी वाडीप्रमुख सहदेव पाडावे,गावकारवाडी वाडीप्रमुख यशंवत पाडावे,कळंबुशी उपशाखाप्रमुख प्रमोद चव्हाण,दत्ताराम म्हापरले,रमेश पवार,सुरेश आग्रे,प्रभाकर पवार,संदिप पवार,देवेंद्र चव्हाण यांच्या सह शेकडो कार्यकर्ते व महिला यांचा समावेश आहे. प्रवेशा दरम्यान प्रत्येक पदाधिकारी कार्यकर्त्याने मनोगत व्यक्त करताना आमदार शेखर निकम यांच्या कामाची प्रशंसा करत कोट्यावधी पेक्षा जास्त निधी विविध योजनेतून मंजूर करत जो ना भूतो ना भविष्यात न होणारा विकास गेल्या साडेचार वर्षात केला आहे. त्याचे प्रत्येकजन गुण गाण गात होता. व एक आदर्शवत असे राजकारणातील म्हणून सन्मान करत होता.

आमदार शेखर निकम यांनीसुद्ध सर्व प्रवेशककर्त्यांचे जल्लोषात स्वागत करत प्रत्येकाने सामाजिक करत, आप – आपसातील वाद – विवाद बाजूला ठेवत पक्ष संघटना वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा असे सांगत मतदार संघाच्या विकासासाठी आपण बांदील आहोत अन ती माझी प्रथम जबादारी असेल असा जनसमुदायास शब्द दिला. यावेळी जयंत खताते,दादा साळवी,रमेश राणे,राजेद्र पोमेडकर,राजेद्र सुर्वे,अबु ठसाळे,सुशिल भायजे,बंधू सुर्वे,मयुर बाष्टे,शेखर उकार्डे,शांताराम भायजे,दिपक जाधव,गजानन सुर्वे,अमित मचिवले,नाना कांगणे,अक्षय चव्हाण,सुबोध चव्हाण,शशिकांत घाणेकर,संतोष गोटेकर,अजिज आलेकर,दिपक शिगवण,शेरआलम खोत,लहू सुर्वे,शैलेश चव्हाण,सिद्धर्थ पवार,बबू कवळकर,पांडूरंग येलवंडे,शपी शहा,अंनत गोटेकर,नितीन भोसले,मंगेश बंडागले,बाळा पंदेरे,रामू पंदेरे,निलेश कदम,सचिन साडविलकर,डॉ रजित पाटील,अमित कदम,मनोज जाधव,सिध्देश लाड,सचिन पाटेकर,राहुल शिंदे,बाबु मोहिते आदी धामापूर गटातील पदाधीकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.




# एमआयटी यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात २२ जानेवारी रोजी रुग्णांना सर्व आरोग्य सुविधा मोफत

लातूर दि.१८ – मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम यांचे भव्य दिव्य मंदिर आयोध्या नगरीत उभे राहत आहे. या निमित्ताने देशभर आनंद उत्सव साजरा केला जात असून लातूर येथील एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात २२ जानेवारी रोजी दाखल झालेल्या रुग्णांना सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा मोफत देण्याचा निर्णय रुग्णालय प्रशासनाने घेतला आहे. तेव्हा सर्व प्रकारच्या रुग्णांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

राम जन्मभूमी अयोध्या नगरीत राम मंदिर व्हावे ही गेली कित्येक वर्षापासून लाखो नाहीतर करोडो भाविकांच्या मनात असलेली भावना २२ जानेवारी २०२४ रोजी अनेक संघर्षानंतर पूर्ण होत आहे. आजही भारतीयांच्या मनावर प्रभू श्रीराम अधिराज्य करतात. प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर अयोध्या नगरीत उभे राहताना बघणे हा प्रसंगच प्रत्येकाच्या जीवनातील अविस्मरणीय ठरणारा आहे. यानिमित्ताने देशभर सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करून आनंद उत्सव साजरा करण्यात येत आहे.

लातूर येथील एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात २२ जानेवारी सोमवार रोजी दाखल होणाऱ्या रुग्णांच्या मधुमेह, एक्स रे, सोनोग्राफी, छातीचे आजार, पोटाचे आजार, ब्लड लघवी यासह सर्व प्रकारच्या तपासण्या आणि शस्त्रक्रिया मोफत केल्या जाणार आहेत सर्व सोयी सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत.

प्रभू श्रीराम मंदिर प्राण प्रतिष्ठापना सोहळ्याच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण रुग्णालयात दिल्या जाणाऱ्या मोफत सोयी सवलतीचा आणि सुविधेचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन.पी. जमादार, उपअधिष्ठाता डॉ. नागोबा, सहसंचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे, शैक्षणिक प्रकल्प अधिकारी डॉ. सरिता मंत्री, रुग्णालय अधीक्षक डॉ. माले, मानव संसाधन अधिकारी ऋषिकेश कराड, मुख्य प्रशासकीय अधिकारी सचिन मुंडे, रुग्णालय प्रशासकीय अधिकारी श्रीपती मुंडे यांनी केले आहे.

# सरकारने शेतकर्यांना दिलेला शब्द न पाळल्याने लातुरात रेल्वे अडवणार

लातूर /- आम्ही पक्षाचे झेंडे बाजूला ठेऊन शेतकरी शेतमजूर म्हणून एकत्र येत सातत्याने सरकारला सोयाबीनकापसाच्या प्रश्नासह निराधारांची प्रश्न घेऊन शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली बुलढाण्यातील महाएल्गार, मुंबईतील मंत्रालयाचा ताबा घेण्याचे आंदोलन, हिवाळी अधिवेशतील नागपुरातील हल्लाबोल आंदोलन अशी विविध आंदोलन केलेली आहेत त्यावेळी लबाड सरकारने आमच्या मागण्या मंजूर करु असा खरा शब्द दिला होता तो पाळला नाही त्यामुळे नुकताच औसा येथे पार पडलेल्या शेतकरी शेतमजूर निराधार महाआक्रोश मोर्चात सरकारला १८ तारखेपर्यंत आमच्या मागण्या मान्य करण्यासंदर्भात अल्टीमेटम दिले होते तरीसुद्धा सरकार गंभीर नाही म्हणून लातूरात रेल्वे अडवणार अशी माहिती राजेंद्र मोरे आणि राजीव कसबे यांनीप्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.आधुनिक यांत्रिकीकरणामुळे सोयाबीन कापूस उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. त्यात पावसात खंड पडल्याने व येलो मोझॅकमुळे सोयाबीनचे तर बोंडअळीमुळे कापसाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे उत्पादनात घट आली आहे. राज्यातील शेतकर्यांपैकी ५० % पेक्षा जास्त शेतकरी हा सोयाबीनकापूस उत्पादक आहे. देशाच्या सोयाबीनच्या उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा हा मोठा आहे. यावर्षी सोयाबीनला प्रति क्विं. ७,२४० /- रु. उत्पादन खर्च आला आहे. सध्या सोयाबीनचा बाजारभाव प्रति क्विं. ४ ते ५ हजार रु. आहे. यावर्षी कापसाला प्रति क्विं. ८,०८४ /- रु. उत्पादन खर्च आला आहे. सध्या कापसाचा बाजारभाव प्रति क्विं. ६ ते ७ हजार रु. आहे. मिळणार्या भावात उत्पादन खर्चही भरून निघणार नाही, अशी स्थिती आहे. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होवून आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा आहे. अश्या परिस्थितीत केंद्र सरकारने काही धोरणात्मक बदल करणे गरजेचे आहे. त्यामुळे सोयाबीन कापूस उत्पादकांच्या न्याय्य मागण्यांसाठी शेतकरी गेल्या ३ महिन्यांपासून रस्त्यावर उतरला आहे. २८ नोव्हेंबरला हजारो शेतकर्यांनी मंत्रालयाचा ताबा घेण्यासाठी मुंबईत धडक दिली.त्यानंतर २९ नोव्हेंबर रोजी सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे राज्यसरकारच्या वतीने उपमुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी आमच्यासोबत चर्चा केली. या चर्चेत येलो मोझॅक, बोंड अळी व पावसात खंड पडल्याने झालेल्या नुकसानीची फायनल रक्कम लवकरात लवकर देण्याचाही शब्द त्यांनी दिला होता. तसेच सोयाबीन कापूस दरवाढीसाठी केंद्र सरकार सोबत बैठक लावण्याचा शब्द त्यांनी दिला होता. दिलेल्या शब्दानुसार सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे ९ डिसेंबर २०२३ रोजी केंद्रीय वाणिज्य मंत्री ना.पियुषजी गोयल यांच्यासमवेत उपमुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी आमची बैठक घडवून आणली. या बैठकीत सोयाबीन दरवाढीसाठी सोयापेंड निर्यातीला प्रोत्साहन देऊ, सोयापेंड आयात करणार नाही व खाद्य तेलावरील आयात शुल्क वाढवू असा शब्द केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल साहेबांनी दिला होता. तसेच २९ नोहेंबर रोजी उपमुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस साहेबांसोबत झालेल्या बैठकीत अन्य मागण्यांसंदर्भात सरकारचे वतीने सकारात्मक शब्द दिला गेला. दिलेल्या शब्दांची अंमलबजावणी सरकारने न केल्याने शेतकर्यांनी १९ डिसेंबर रोजी नागपूर अधिवेशनावर हल्लाबोल आंदोलन केले. हे आंदोलन सरकारने पोलिसांच्या माध्यमातून दडपण्याचा प्रयत्न केला. आजवर सोयाबीन कापूस उत्पादक शेतकर्यांना न्याय देण्यासंदर्भात दिलेल्या शब्दाची कुठलीही अंमलबजावणी न केल्याने शेतकर्यांमध्ये सरकार विरोधात प्रचंड रोष निर्माण झाला आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE